तरुण भारत संवाद
बुधवार, ४ जून २०२५



कोल्हापूर : ॲडव्हान्स जेईई परीक्षेत यश मिळवल्याबद्दल प्रथमेश ढगेचा सत्कार करताना विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे. सोबत संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, एस. एन. साळुंखे, शिल्पा भोसले, गीतांजली साळुंखे आदी.

# विवेकानंद कॉलेजच्या प्रथमेशचे ॲडव्हान्स जेईई परीक्षेत यश

प्रतिनिधी
कोल्हापूर

मे २०२१ मध्ये झालेल्या जेईई ॲडव्हान्स परीक्षेत विवेकानंद कॉलेजचा विद्यार्थी प्रथमेश ढगे याने ८६४१ एआरआय रँक मिळवून यश संपादन केले. या यशाबद्दल स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचें कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. एस. एन. साळुंखे, शिल्पा भोसले, प्रा. गीतांजली साळुंखे, प्रा. के. जे. गुजर, प्रा. एस. एन. ढगे, प्रा. एस. टी. शिंदे, प्रा. एन. एन. हिटणीकर, प्रा. एस. पी. पाटील, प्रा. आर. व्ही. घाटगे उपस्थित होते. संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे यांनी अभिनंदन करुन त्याला उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्रथमेशला विवेकानंद कॉलेजच्या विज्ञान शाखेतील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

4/6/2025

4.6.2025

मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत

द ग्लोबल टाइम्स मुंबई

मराठी दैनिक

भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

Register No. : RNI - MAHMAR /2012/44621

वर्ष - १३ अंक - १४३ बुधवार दि. ४ जून २०२५ पाने - ०८ किंमत - ₹३

# JEE - Advance परीक्षेत विवेकानंद कॉलेजचे यश



कोल्हापूर : मे २०२५ मध्ये झालेल्या JEE - Advance परीक्षेत विवेकानंद कॉलेजचा विद्यार्थी प्रथमेश निलेश ढगे याने AIR ८६४१ रँक मिळवून धवल यश संपादित केले. त्याच्या या यशाबद्दल विवेकानंद कॉलेज च्यावतीने श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. एस. एन. साळुंखे, सौ. शिल्पा भोसले, प्रा. सौ. गीतांजली साळुंखे, प्रा. के. जे. गुजर, प्रा. सौ. एस. एन. ढगे, प्रा. एस. टी. शिंदे, प्रा. एन. एन. हिटणीकर, प्रा. सौ. एस. पी. पाटील, प्रा. आर. व्ही. घाटगे व गुरुदेव कार्यकर्ते उपस्थित होते. प्रथमेशला विवेकानंद कॉलेजच्या विज्ञान शाखेतील प्राध्यापकांचे बहुमोल मार्गदर्शन. प्रथमेश ढगेच्या या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांनी अभिनंदन करून त्याला उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

हॅलो प्रभात

# जेईई ॲडव्हान्स परीक्षेत विवेकानंद कॉलेजचे यश

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

मे २०२५ मध्ये झालेल्या JEE advance परीक्षेत विवेकानंद कॉलेजचा विद्यार्थी कु. प्रथमेश निलेश ढगे याने खुल ८६४१ रँक मिळवून धवल यश संपादित केले. त्याच्या या यशाबद्दल विवेकानंद कॉलेजच्या वतीने श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रम ासाठी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कौस्तुभ गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार , प्रा.एस एन साळुंखे, सौ शिल्पा भोसले, प्रा सौ गीतांजली साळुंखे , प्रा के जे गुजर, प्रा सौ एस एन ढगे, प्रा एस टी शिंदे , प्रा एन एन हिटणीकर, प्रा सौ एस पी पाटील, प्रा आर व्ही घाटगेव गुरुदेव कार्यकर्ते उपस्थित होते. त्याच्या या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेक्रेटरी मा.प्राचार्या सौ शुभांगी गावडे यांनी अभिनंदन करुन त्याला उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

हॅलो प्रभात

# शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जयंती सोमवारी

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंतीनिमित्त सोमवार ९ जून रोजी सकाळी १०.३० वाजता पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखेअसणार आहेत. दुपारी २ वाजता चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.



तरी या कार्यक्रमास जास्तीत जास्त शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनीउपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्या सचिव प्राचार्य शुभांगी गावडे यांनी केले आहे.